**नि. फौ.ख.क्र. ११०/२०१७**

सरकार....वि. दिपक गायकवाड

**निशानी क्र.– ३२**

अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र.४** यांची जबानी

मी शपथेवर सांगते की,

माझे नांव– सुरज दत्तात्रय गायकवाड

वय– २६ वर्षे , धंदा– काहीही नाही.

रा. भांडगांव, ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपासणी सरकारी विधीज्ञ श्री. एम. डी. करे यांचे मार्फत**

१. फिर्यादी सिंधुबाई ही माझी आई आहे. मी आरोपीस ओळखतो, तो माझ्या शेजारी राहण्यास आहे. घटना हि दिनांक १४/१२/२०१६ रोजी रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास आमच्या राहते घरी घडली आहे. त्यावेळी मी, माझा भाऊ व वडिल असे आमच्या किराणा दुकानावर होतो. त्यावेळी माझी आई घरी होती. सदरचे किराणा दुकान हे आमच्या घराच्या समोर आहे. आई त्यावेळी घरात भाजी निवडत असतांना आरोपी हा तेथे येवून तिची छेडछाड केली. आरोपीने माझ्या आईचा हात धरला तसेच ब्लाऊजमध्ये हात टाकून छेडछाड केली. त्यानंतर आम्ही घरी गेल्यानंतर आरोपी हा घराच्या दुस–या दारातून पळून गेला. त्यानंतर आम्ही घरी गेल्यानंतर माझ्या आईने घटनेबाबत आम्हांला सांगितले. त्यावेळी आम्ही आईला काय झाले विचारले असता तिने सांगितले की, ''आरोपी हा तेथे आला होता व त्याने ब्लाऊज फाडला.त्यावेळी आईचा ब्लाऊज फाटलेला होता. त्यानंतर मावशी व काका यांना बोलावून आई–वडिल यांनी तक्रार दाखल केली. सदर घटनेबाबत पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता. मी आरोपीस ओळखतो, तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण**.

**उलट तपास आरोपी करीता विधीज्ञ श्री. ए. टी. भोसले यांच्या मार्फत–**

२. माझे शिक्षण पदवीपर्यंत झाले आहे. माझे पदवीचे शिक्षण आय कॉलेज इंदापूर येथे झाले आहे. आमचे किराणा दुकानाचे नांव साजन किराणा स्टोअर्स असे आहे. माझे दुकानापासून आमचे घर अंदाजे ३० फूट इतके अंतरावर आहे. आमच्या घराच्या पूर्व दिशेला आरोपीचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्या घराच्या दरम्यान एक गाईचा गोठा आहे. हे

म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या घराच्या मध्ये एक जनावरांचा उकीरडा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर उकीरड्याच्या वासावरुन आरोपी व त्याचे कुटूंबियांचे आमचेसोबत वाद होत होते.

३. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या काही दिवसापूर्वी आरोपीने दुस–यांकडून गाय व म्हशी विकत आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल माशाचे व्यवसाय या व्यतिरिक्त शेळ्या मेंढ्या खरेदी विक्रीचा सुध्दा व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पूर्वी आम्ही एक ड्रीम युगा मोटारसायकल विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, तसेच आरोपीने सुध्दा होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल विकत घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या सारखी दुचाकी वाहन विकत घेतल्याने आरोपी विरुध्द आमचे मनात आकस निर्माण झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर आकसामुळे आरोपी व आमच्या कुटूंबात वादविवाद होत होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी आमच्या घराच्या परिसरमध्ये विद्युत पुरवठा खंडीत झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी आमच्या घराच्या रस्त्याच्या कडेला पथदिवे बसविलेले नव्हते. आमच्या दुकानातून घरी पोहोचण्यास अंदाजे अर्धा मिनिटाचा अवधी लागतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, घरी व दुकानात चार्जींगचे बल्ब लावलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर आम्ही घरी पोहोचण्याच्या पूर्वी आरोपी हा घरातून निघुन गेला होता. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, आम्ही घरी गेल्यावर तो दुस–या दाराने जात होता. घटनेच्या वेळी आमच्या घरी मी, माझे वडिल व भाऊ असे तीन पुरुष मंडळी होतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या तिघांपैकी आरोपीस पकडण्याचा अथवा थांबविण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा घटनेनंतर अंधाराचा फायदा घेवून पळून गेला होता.

५. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी माझी आई नेमकी कोणती भाजी निवडत होती हे आता मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर माझ्या आईचे वस्त्र कुठपर्यंत फाटले होते हे आता मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर फाटलेल्या वस्त्राचे वर्णन माझ्या जबाबामध्ये केलेला नाही.

६. आमच्या घरापासून इंदापूर पोलीस स्टेशनला येण्यास अंदाजे २५–३० मिनिटाचा अवधी लागतो. घटनेनंतर माझे काका व मावशी यांना आमच्या घरी पोहोचण्यासाठी अंदाजे एक ते दिड तासाचा अवधी लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे काका व मावशी

घरी आल्यानंतर आम्ही चर्चा केली व त्यानंतर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला. फिर्याद देतांना माझे काका व मावशी पोलीस स्टेशनमध्ये हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझी आई यांच्यामध्ये पूर्ववैमनस्य असल्याने रागापोटी खोटी फिर्याद नोंदविली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी घरी नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी आईच्या सांगणेवरुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास – काहीही नाही.</u>**

| | | |
|---|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.04.22 16:17:18 +0530<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर<br>दिनांक – २२/०४/२०२६ | | समक्ष,<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.04.22 16:17:22 +0530<br>(एम.एच. फारुकी)<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर. |

γ

**नि. फौ.ख.क्र. ११०/२०१७**

सरकार....वि. दिपक गायकवाड

**निशानी क्र.– ३१**

अभियोग पक्षातर्फे **<u>साक्षीदार क्र.३</u>** यांची जबानी

मी शपथेवर सांगते की,

माझे नांव– राजेंद्र श्रीरंग गायकवाड

वय– ५३ वर्षे , धंदा– शेती

रा. भांडगांव, ता. इंदापूर, जि. पुणे.

**<u>सरतपासणी सरकारी विधीज्ञ श्री. एम. डी. करे यांचे मार्फत</u>**

१. दिनांक १५/१२/२०१६ रोजी मी पोलीसांसोबत पंचनाम्यासाठी कोठेही गेलो नाही. पोलीसांनी एका लिहिलेल्या कागदावर बावडा पोलीस स्टेशनमध्ये माझी सही घेतली होती. आता मला दिनांक १५/१२/२०१६ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक ०१ वर माझी सही असून त्यातील मजकूर मला माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे स. स. अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/१२/२०१६ रोजी पोलीसांनी मला मौजे भांडगांव, ता. इंदापूर, जि. पुणे येथे बोलाविले होते व त्याठिकाणी मी व दुसरा पंच विठ्ठल गायकवाड असे आम्ही पोलीसांसोबत हजर असतांना फिर्यादीने घटनेची हकिकीत सांगून मौजे भांडगांव येथे तिच्या घरात घटनास्थळाचे ठिकाण दाखविले तेथे पोलीसांनी आमच्या समक्ष दिसत्या परिस्थीतीच्या वर्णनासह घटनास्थळ पंचनामा तयार केले तसेच घटनास्थळाचा कच्चा हात नकाशा आमच्या समक्ष रेखाटले. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी घटनास्थळ पंचनामा व कच्चा हात नकाशा मला दाखविण्यात आले, ते वाचुन त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस वाचविण्यासाठी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

<u>सरतपास पुर्ण</u>.

**<u>उलट तपास आरोपी करीता विधीज्ञ श्री. ए. टी. भोसले यांच्या मार्फत–</u>**

**३.** **<u>उलटतपास नाकारला.</u>**

| | | |
|---|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.04.22 16:17:28 +0530<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर<br>दिनांक – २२/०४/२०२६ | | समक्ष,<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.04.22 16:17:32 +0530<br>(एम.एच. फारुकी)<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर. |